महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि-३/२०२३/ 733
दिनांक : /०१/२०२३
13 FEB 2023

**प्रति,**
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : जाती दाव्याची तपासणी करणेबाबत.**
**संदर्भ :** १.मा.आयुक्त,अदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचे पत्र क्र. आसंप्रसं-२०२२/प्र.क्र.६६/ का.३(समन्वय)/४४६२ दि. २६.१२.२०२२
२.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. २अ/एनडीएम/ वैधतातपासणी/२०२३/३४ दि.०९.०२.२०२३

उपरोक्त संदर्भ क्र.०१ च्या पत्रान्वये मा.आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांनी श्री सदानंद नुऱ्या गावीत जिल्हा नंदुरबार यांनी दि. २३.११.२०२२ रोजी अप्पर मुख्य सचिव आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई यांना दिलेल्या निवेदनात सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीत विद्यार्थ्यांनी बनावट जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर केल्याच्या शंकेमुळे खऱ्या अनुसूचित जमातीच्या अर्जदारांना वंचित केले असल्याचे नमूद केले आहे.

सदर शंकेचे निरसन करण्याच्या अनुषंगाने या विभागातील शैक्षणिक वर्ष २०१२-१३ ते २०१६-१७ पर्यंतच्या अनुसुचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश घेतलेले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत या संचालनालयाला कळविले आहे. जेणे करुन सदर जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र यांच्या आधारे संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्याकडून वैधता प्रमाणपत्र दिल्याची सत्यता पडताळणी करणे सोईचे होईल व त्याव्दारे निवेदनकर्ता यांच्या शंकेचे निरसन होईल.

तरी उपरोक्त संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१२-१३ ते २०१६-१७ पर्यंतच्या अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश घेतलेल्या या विभागातील सर्व संस्थांच्या विद्यार्थ्यांच्या जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र व त्या-त्या वर्षामध्ये संबंधित विद्यार्थ्यांची नावे असलेली गुणवत्ता यादीच्या साक्षांकित छायाप्रतीसह शैक्षणिक वर्ष निहाय प्रस्ताव या कार्यालयास दि.२२/०२/२०२३ पर्यत सादर करण्यात यावे. जेणेकरुन सदरचे प्रस्ताव संचालनालयास तात्काळ सादर करणे सोईचे होईल

(मा.रा.जाधव)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४५०
ई-मेल-desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक:२अ/एडीएम/वैधतातपासणी/२०२२/३८ दिनांक: 9 FEB 2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय : जाती दाव्याची तपासणी करणेबाबत..
संदर्भ : आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांचे पत्र क्र. आसंप्रसं-२०२२ / प्र.क्र.६६ / का. ३ (समन्वय)/४४६२, दि.२६.१२.२०२२

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांनी श्री सदानंद नु-या गावीत, जिल्हा नंदुरबार यांनी दि. २३/११/२०२२ रोजी अपर मुख्य सचिव आदिवासीविकास विभाग, मंत्रालय,मुंबई यांना दिलेल्या निवेदनात सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीतील विद्यार्थ्यांनी बनावट जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर केल्याच्या शंकेमुळे ख-या अनुसूचित जमातीच्या अर्जदारांना वंचित केले असल्याचे नमूद केले आहे.

सदर शंकेचे निरसन करण्याच्या अनुषंगाने आपल्या विभागातील शैक्षणिक वर्ष २०१२-१३ ते २०१६-१७ पर्यंतच्या अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश घेतलेले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र यांच्या झेरॉक्स प्रती तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत या संचालनालयाला कळविले आहे. जेणे करुन सदर जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र यांच्या आधारे संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्याकडून वैधता प्रमाणपत्र दिल्याची सत्यता पडताळणी करणे सोईचे होईल व त्याद्वारे निवेदनकर्ता यांच्या शंकेचे निरसन होईल.

तरी शैक्षणिक वर्ष २०१२-१३ ते २०१६-१७ पर्यंतच्या अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश घेतलेल्या आपल्या विभागातील सर्व संस्थाच्या विद्यार्थ्यांच्या जात प्रमाणपत्राच्या व जात वैधता प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती एकत्रित संकलित करुन या संचालनालयास तात्काळ पाठविण्यात याव्यात.

( डॉ. विनोद मोहितकर )
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत: मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,२८, क्वीन्स गार्डन,पुणे-४११००१ याना माहितीस्तव.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.
10 FEB 2023
आवक क्र. 9308

D:E-Admission 2023Ro